# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०६/१०/१७
## दि.०५/१०/१७ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हिंजवडी पो स्टे ४६१/१७,भादविक २७९,३०४(अ),३३७,४२७,मोव्हे.१८४,१३२(१)(क),११९/१७७ |
| **फिर्यादी** | वर्षा अैय्यर,वय-२४,रा.संभाजीनगर,चिंचवड,पुणे |
| **आरोपी** | डंपर वरील अज्ञात चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/१०१७ रोजी १९/०० वा.विप्रो सर्कल बस स्टॉप समोर सार्वजनिक रोडवर हिंजवडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांची मावशी सौ.जयालक्ष्मी गणेशन अय्यर,वय-४५,रा.विराठ सोसा. संभाजीनगर,चिंचवड,पुणे यांचेसह मोपेडवरून त्यांचे राहते घरी जात असताना,यातील नमुद डंपर चालकाने त्याचे ताब्यातील डंपर हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने, अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी दोघांना खाली पाडुन,फिर्यादीस किरकोळ जखमी करून त्यांची मावशी सौ.जयालक्ष्मी गणेशन अय्यर हिस गंभीर जखमी करून,तीचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एन.एस.न्यामणे ९९२३४५५१११ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वाकड पो स्टे ५६६/१७,भादविक ३०४(अ) |
| **फिर्यादी** | ए.बी.सोनवणे,सहा.पो.फौज. वाकड पोलीस ठाणे पुणे शहर |
| **आरोपी** | १.मालक २.ठेकेदार ३.सब ठेकेदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/१०/२०१७ रोजी दुपारी १२/३० वा.के.के.श्रीराम ग्रुप कन्ट्रक्शन साईडवरील पहील्या मजल्यावर रहाटणी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम १.मालक २.ठेकेदार ३.सब-ठेकेदार यांनी त्यांचे के.के.श्रीराम ग्रुप कन्ट्रक्शन साईडवरील पहील्या मजल्यावर रहाटणी,पुणे येथील बांधकाम चालु असलेल्या साईटवरील,मजुर कामगारांकडुन काम करवुन घेत असताना,कामगारांचे जिवीताचे व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन त्यांना हेल्मेट,सुरक्षित जाळी, सेफ्टी बेल्ट इत्यादी योग्य ती साधनसामुग्री पुरविणे आवश्यक असताना,त्यांना तशी कोणतीही सुरक्षित साधने न पुरविता,तसेच उघडया डक्टवर योग्य ती साधन ठेवण्याची सोय न करता,हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्यामुळे,यातील कामगार धनेश देवनाथ सिंह,वय-३०,रा.लेबर कॅम्प,के.के. श्रीराम कन्ट्रक्शन,रहाटणी,पुणे हा इमारतीचे चौथ्या मजल्यावर काम करीत असताना,तो वरून खाली पडुन,त्यांचे डोक्यास गंभीर दुखापत होवुन मयत झाला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. व्ही.व्ही.चव्हाण ९६५७३७७७११ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | अलंकार पो स्टे १६१/१७,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-४८,रा.कर्वेनगर, पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/१०/२०१७ रोजी सकाळी ०५/५० वा.विठ्ठल मंदिर,खत्री आईस्क्रिम समोरचे गल्लीत ताथवडे उदयाना जवळ,स्वप्नशिल्प बिल्डिंगचे समोर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया पायी जात असताना,यातील नमुद मोटर सायकलवरील दोन इसमांनी फिर्यादी यांचे जवळ येवुन,त्यांचे गळयातील ४०,०००/- किचे सोन्याचे मंगळसुत्र हिसका मारुन तोडुन चोरुन नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) विजयकुमार शिंदे ९८२१११८६५४ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरूड पो स्टे ३७६/१७,भादविक ४५७,३८० |
| **फिर्यादी** | सौ.स्मिता राजाबली,वय-४९ वर्षे,रा.औंध,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/१०/१७ रोजी २०/०० वा.ते दि.०४/१०/१७ रोजी ०९/०० वा.चे दरम्यान कोथरूड कचरा डेपो मधील पुणे स्वच्छ ऑफिस मध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे कोथरूड कचरा डेपो मधील पुणे स्वच्छ ऑफिस हे कुलुप लावुन बंद असताना, कोणीतरी अज्ञात इसमाने ऑफीसचे मागील दरवाज्या कशाचे तरी सहायाने उघडुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,ऑफीस मधील एकुण सहा लुमिनस कंपनीच्या इन्व्हर्टरच्या बॅट-या,एक सोनी कंपनीचा छोटा कॅमेरा,एक सीसीटिव्ही डीव्हीआर,दोन ४३ इंची एलसीडी टी.व्ही.,चार कॉम्प्युटर-मॉनिटर व एक सीसीटिव्ही कॅमेरा असा एकुण २०,५००/- रु किचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.हवा. काळे ९९२३००९०३६ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे ३४०/१७,भादविक ४१९,४२० |
| **फिर्यादी** | सिध्दांत कासट,वय-२१,रा.सिंहगड रोड,पुणे |
| **आरोपी** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे जुलै २०१७ ते दि.२४/०८/१७ रोजीचे दरम्यान कृष्णा हॉटेल पुणे स्टेशन,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी ओलक्सवर लॅपटॉप विक्रीची जाहिरात टाकली होती. सदर इसमाने सदरची जाहिरात पाहुन फिर्यादी यांचेशी संपर्क करून,फिर्यादी यांचेकडुन लॅपटॉप घेवुन त्यांना ७२,०८०/- रूपयेचा बँकेचा न जुळणा-या सहीचा चेक देवुन,फिर्यादी यांची नमुद रकमेची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.एम.पवार ९७६७२२३५३९ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लष्कर पो स्टे २१५/१७,भादविक |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-४८,रा.पुणे |
| **आरोपी** | एक महिला,वय-४३,रा.एनआयबीएम रोड,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/०१०/२०१७ रोजी १४/१० ते १४/३० वा.चे दरम्यान मा.लष्कर कोर्ट,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया सरकारी अभियोक्ता असुन,फिर्यादी यांनी नमुद महिला हिची केस नीट चालविली नाही या कारणावरून सदर महिलेने फिर्यादी यांचे मा.लष्कर कोर्टाचे ऑफिस मध्ये गोंधळ घालुन,फिर्यादी हे करीत असलेल्या सरकारी कामकाजात अडथळा निर्माण करून, अपशब्द वापरून,त्यांना बघुन घेण्याची धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. श्रीमती. जे.जी.पन्हाळे ८४२४९७३३३८ |

## दि.०५/१०/१६७ रोजी ००/०० वा. ते २४/०० वा. पर्यंतचा अटक आरोपी तक्ता

| अनं | पोलीस ठाणे | कलम | आरोपीचे नांव | वय |
|---|---|---|---|---|
| १ | येरवडा | भादविक ३८० | सीजो जॉन | ३२ |
| २ | कोढवा | भादविक ४२० | हेमंत तुकाराम बुध्दीवंत | ४७ |
| ३ | समर्थ | भादविक ४५४,४५७,३८० | अमिन अकबर मॉलवी | २३ |
| ४ | समर्थ | भादविक ४५४,४५७,३८० | शेएब हारूण शेख | २५ |
| ५ | विश्रांतवाडी | भादविक ४२०,४६७,४६८,४७१,१२०(ब) | केजरीमल मोतीलाल मुथा | ५३ |
| ६ | विश्रांतवाडी | भादविक ४२०,४६७,४६८,४७१,१२०(ब) | आम प्रकाश मुथा | ३१ |
| ७ | वारजे | भादविक ४५४,४५७,३८०,४११,३४ | अतुल चंद्रकांत आमले | २२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | वारजे | भादविक ४५४,४५७,३८०,४११,३४ | रघुनाथ भिमराव मोहिते | ३२ |
| ९ | खडकी | भादविक ३०७,३२४,३२३,१४३,१४४,१४७,१४८,१४९ | रोहित दिपक खरात | २५ |
| १० | खडकी | भादविक ३०७,३२४,३२३,१४३,१४४,१४७,१४८,१४९ | संदिप सुनिल कवाळे | १९ |
| ११ | खडकी | भादविक ३०७,३२४,३२३,१४३,१४४,१४७,१४८,१४९ | अक्षय सुनिल कवाळे | १९ |
| १२ | कोथरूड | भादविक ३०७,१४३,१४७,आर्म ॲक्ट ४(२५) | ऋषीकेश राजु ठाकुर | १९ |
| १३ | कोथरूड | भादविक ३०७,१४३,१४७,आर्म ॲक्ट ४(२५) | अक्षय किसन साठे | २१ |
| १४ | सांगवी | भादविक ४०६,४२०,४६७,३४ | सुधाकर भास्कर जाधव | ४२ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**